विद्युत शुल्क निरीक्षक, गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या नियतकालिक बदल्या सन २०१९...

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन आदेश क्र. बदली-२०१९/प्र.क्र. ७९/ऊर्जा-५
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक १२ जून, २०१९

शासन आदेश:-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (१) , ४ (२) व ४ (३) मधील तरतूदीनुसार विद्युत निरीक्षणालय शाखेतील विद्युत शुल्क निरीक्षक गट-ब (राजपत्रित) या संवर्गातील अधिकाऱ्यांची बदली करण्यात येत असून त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र. ४ मध्ये दर्शविलेल्या पदावर करण्यात येत आहे:-

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव व पदनाम	सध्याची पदस्थापना	बदलीनंतर पदस्थापना
१	२	३	४
१.	श्रीमती अ. अ. जोशी, विद्युत शुल्क निरीक्षक	विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग, पुणे	विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग, नाशिक (श्री. यु. र. बंगाळ यांच्या बदलीमुळे रिक्त होणाऱ्या पदावर)
२.	श्री. राजेश क. वांद्रेकर, विद्युत शुल्क निरीक्षक	विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग, ठाणे क्र.१	विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग, पुणे (श्रीमती. अ. अ. जोशी यांच्या बदलीमुळे रिक्त होणाऱ्या पदावर)
३.	श्री. यु. र. बंगाळ, विद्युत शुल्क निरीक्षक	विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग, नाशिक	विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग, ठाणे क्र.१ (श्री. राजेश क. वांद्रेकर यांच्या बदलीमुळे रिक्त होणाऱ्या पदावर)

२. अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर यांनी बदली झालेल्या अधिकाऱ्याला त्यांच्या बदलीच्या ठिकाणी त्वरीत कार्यभार घेता यावा म्हणून आवश्यक ती स्थानिक पर्यायी व्यवस्था करुन सध्याच्या पदभारातून तात्काळ कार्यमुक्त करावे व त्यांना बदलीच्या ठिकाणी ताबडतोब रुजू होण्यास सांगावे. तसेच बदली झालेल्या अधिकाऱ्यास रजा मंजूर करु नये.

३. तसेच या आदेशान्वये करण्यात आलेल्या बदल्या रद्द करणे किंवा त्यात बदल करणे यासाठी राजकीय दडपण/दबाव आणल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विद्युत शुल्क निरीक्षक यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ अनुसार शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्यात येईल.

४. संबंधित विद्युत शुल्क निरीक्षक यांनी नियुक्तीच्या नवीन ठिकाणी तात्काळ रुजू होऊन तसा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६१२१५२५२१२६१० असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prashant Pundalik Badgeri

Digitally signed by Prashant Pundalik Badgeri
DN: CN = Prashant Pundalik Badgeri, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Industry Energy And Labour Department
Date: 2019.06.12 15:18:46 +05'30'

(प्र. पुं. बडगेरी)
शासनाचे उपसचिव

प्रति,

१. मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, प्रशासकीय इमारत, ३ रा मजला,
२. रामकृष्ण चेंबुरकर मार्ग, चेंबुर (पू.) मुंबई-७१.
३. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/निवासी लेखाधिकारी, मुंबई.
५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
६. अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर.
७. सर्व संबंधित विद्युत शुल्क निरीक्षक (अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर यांच्यामार्फत)

प्रत:

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव , मंत्रालय, मुंबई ४०००३२.
४. मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
५. प्रधान सचिव (ऊर्जा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
६. उपसचिव (ऊर्जा-५) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
७. निवडनस्ती (ऊर्जा-५)